# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.08.2025** **वार:बुधवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते येत्या शुक्रवारी बिहारमधील गया इथं औंटा-सिमारिया प्रकल्पाचं उद्घाटन होणार
2. परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर रशियाच्या तीन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यासाठी मॉस्कोमध्ये दाखल
3. भारत - चीन रचनात्मक संबंध प्रादेशिक आणि जागतिक शांतता, समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास
4. उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर, आणि
5. सोळाव्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रश्मिका सहगलला सुवर्णपदक

**<u>मोदी गया प्रकल्प</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या शुक्रवारी, 22 तारखेला बिहारमधील गया इथं औंटा-सिमारिया प्रकल्पाचं उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पात गंगा नदीवरील सुमारे दोन किलोमीटर लांबीचा पूल समाविष्ट असून त्यामुळे पाटणा जिल्ह्यातील मोकामा आणि बेगुसराय दरम्यान थेट संपर्क सुरू होणार आहे. हा पूल जुन्या दुपदरी राजेंद्र सेतूला समांतर बांधण्यात आला आहे. या नवीन पूलामुळे उत्तर बिहार आणि दक्षिण बिहार प्रदेशामधील जड वाहनांसाठीचं प्रवासाचं अंतर 100 किलोमीटरपर्यंत कमी होणार आहे, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सदस्य अनिल चौधरी यांनी काल नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. या प्रकल्पामुळे जड वाहनांसाठी प्रवास सोपा आणि जलद होईल तसंच इंधन आणि वाहनांच्या ऑपरेशन खर्चात बचत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2017 मध्ये या प्रकल्पाची पायाभरणी केली होती.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर काल संध्याकाळी रशियाच्या तीन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर मॉस्कोला पोहोचले आहेत. या भेटीदरम्यान, परराष्ट्र व्यवहारमंत्री रशियाचे समपदस्थ सर्गेई लावरोव्ह यांची भेट घेतील आणि द्विपक्षीय मुद्यांचा आढावा घेतील. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांविषयी उभे देशांच्या दृष्टिकोनाविषयी या बैठकीत चर्चा होणार आहे. दीर्घकालीन आणि काळाच्या कसोटीवर उतरलेल्या भारत-रशिया विशेष धोरणात्मक भागीदारीला आणखी बळकटी देणं हा या भेटीचा मुख्य उद्देश आहे. डॉ. एस. जयशंकर आज भारत-रशिया व्यापार, आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्यावरील आंतर-सरकारी आयोगाच्या 26 व्या सत्राचं सह-अध्यक्षपद भूषवतील. त्यानंतर ते मॉस्को इथं भारत-रशिया व्यवसाय मंचाच्या बैठकीलाही संबोधित करतील.

**<u>भारत-चीन</u>**

सध्या भारताच्या दौऱ्यावर असलेले चीनचे परराष्ट्र व्यवहारमंत्री वांग यी यांनी काल राजधानी नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि त्यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. 'भारत आणि चीनमधील स्थिर आणि रचनात्मक संबंध आगामी काळात प्रादेशिक, जागतिक शांतता तसंच समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतील', असं पंतप्रधान मोदी यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना सांगितलं. पंतप्रधानांनी भारत-चीन सीमेवर उभय देशांनी शांतता आणि स्थैर्य राखण्याचं महत्त्व अधोरेखित केलं आणि सीमाप्रश्न निष्पक्ष, वाजवी आणि परस्पर स्वीकारार्ह पद्धतीनं सोडविण्यासाठी भारताची वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. वांग यी यांनी तियानजिनमध्ये होणाऱ्या शांघाय सहकारी संघटना अर्थात एससीओ शिखर परिषदेसाठी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग

यांचा संदेश आणि निमंत्रण पंतप्रधानांकडे सुपूर्द केले. पंतप्रधान मोदींनी गेल्या वर्षी काझानमध्ये राष्ट्राध्यक्ष शी जिन पिंग यांच्याशी झालेल्या भेटीनंतर द्विपक्षीय संबंधांमध्ये होत असलेल्या स्थिर आणि सकारात्मक प्रगतीचं स्वागत केलं.

**<u>बैठक</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीची तातडीची बैठक काल राजधानी नवी दिल्लीमध्ये पार पडली. आगामी उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एन डी ए चे उमेदवार असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन सध्या नवी दिल्लीमध्ये असून कालच्या बैठकीत पंतप्रधानांनी त्यांचा सर्व प्रमुख नेत्यांशी अनौपचारिक परिचय करून दिला. बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपा अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, राजनाथ सिंह, अमित शहा, नीतीन गडकरी, अश्विनी वैष्णव, अनुराग ठाकूर, डॉक्टर जितेंद्र प्रसाद यांच्यासह भाजपा आणि घटक पक्षांचे महत्त्वाचे नेते उपस्थित होते. यावेळी सर्व पक्षांनी आपापसातील मतभेद विसरून एकमतानं राधाकृष्णन यानं निवडून द्यावं, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना दिली. राधाकृष्णन आपला उमेदवारी अर्ज आज दाखल करणार आहेत.

**<u>बी सुदर्शन रेड्डी</u>**

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. इंडी आघाडीच्या सर्व घटकपक्षांनी एकमतानं रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. रेड्डी आपला उमेदवारी अर्ज उद्या, 21 तारखेला दाखल करणार आहेत.

**<u>संसद</u>**

संसदेच्या दोन्ही सभागृहात काल बिहारमधल्या मतदार याद्या पुनरिक्षणासंदर्भात आणि इतर मुद्यांवर विरोधी पक्षांनी प्रचंड गदारोळ केल्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. नंतरही लोकसभेचं कामकाज संध्याकाळी 4 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्याआधी, लोकसभेच्या कामकाजाची आता 21 प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद आणि भाषांतराची सुविधा सभागृहात उपलब्ध झाल्याची घोषणा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केली. भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव काल लोकसभेत चर्चेला आला.

**<u>रेल्वे-नेतृत्व महिला</u>**

दक्षिण-मध्य रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑपरेशन्स, कमर्शियल, आर्थिक व्यवहार, सुरक्षा व्यवस्था आणि वैद्यकीय विभाग या अत्यंत महत्त्वाच्या पाच विभागांचं नेतृत्व महिला अधिकाऱ्यांकडून केलं जात आहे. यामध्ये मुख्य व्यवस्थापक के. पद्मजा रेल्वे वेळापत्रक, वक्तशीरपणा आणि मालवाहतूक कामकाजाची व्यवस्था पाहतात आणि मुख्य व्यावसायिक घडामोडींच्या व्यवस्थापक इति पांडे प्रवासी सेवा, मालवाहतूक महसूल आणि व्यवसाय विकास विभाग हाताळतात. तसंच मुख्य सुरक्षा आयुक्त अरोमा सिंग ठाकूर या ऑपरेशन 'यात्री सुरक्षा' आणि 'मेरी सहेली' सारख्या अनेक सुरक्षा उपक्रमांसह रेल्वे सुरक्षादलाचं नेतृत्व करत आहेत. त्याचप्रमाणे, मुख्य वैद्यकीय संचालक डॉ. निर्मला नरसिंहन, या आठ प्रमुख रुग्णालये आणि 40 आरोग्य युनिट्समधील आरोग्यसेवेची जबाबदारी सांभाळत आहेत. मुख्य आर्थिक सल्लागार टी. हेमा सुनीता या आर्थिक व्यवस्थापन आणि महसूल विभागाच्या प्रमुख आहेत.

**<u>मोनोरेल</u>**

मुंबईत काल संध्याकाळी बंद पडलेल्या मोनोरेलमधून प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी चार तास बचावकार्य सुरू होतं, त्यातून 500 हून अधिक प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं. म्हैसूर कॉलनी आणि भक्ती पार्क स्थानकांदरम्यान अडकलेल्या मोनोरेल ट्रेनमध्ये वीज आणि वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्यानं काही प्रवाशांचा श्वास गुदमरला. त्यापैकी 14 जणांना घटनास्थळी उपचारानंतर घरी सोडण्यात आलं, तर एका मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आणि तिची प्रकृती स्थिर आहे. या घटनेची चौकशी केली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**महाराष्ट्र पाऊस**

गेल्या चार दिवसांत महाराष्ट्रात पाऊस आणि पूर संबंधित घटनांमुळे किमान 21 जणांचा मृत्यू झाला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, कोकण आणि महाराष्ट्राच्या इतर भागात सलग चौथ्या दिवशीही मुसळधार पाऊस सुरू आहे. पुराचा गंभीर परिणाम असलेल्या नांदेड जिल्ह्यात आठ जणांचा मृत्यू झाला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत सुमारे 300 मिमी विक्रमी पाऊस झाला असून त्यामुळे शहरातील सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. हवामान खात्याने आज विदर्भ प्रदेशाला रेड अलर्ट जारी केला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव, पुणे आणि मुंबई दरम्यानच्या सर्व गाड्या पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात आल्या आहेत. ठाणे आणि रायगड जिल्ह्यांनी आज शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. पाटण, जावळी, महाबळेश्वर, वाई, सातारा आणि कराड तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळा आज आणि उद्या बंद राहतील. मुंबईतील मिठी नदीने धोक्याची पातळी ओलांडल्यानंतर सुमारे 350 जणांना वाचवण्यात आलं. कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे देखील उघडण्यात आले आहेत, त्यामुळे कोयना नदीच्या पात्रात 93 हजार 200 क्युसेक पाणी सोडण्यात आलं आहे. धरणातून अचानक पाणी सोडल्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

**सुवर्णपदक**

16 व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रश्मिका सहगलने कझाकस्तानमधील श्यामकेंट इथं झालेल्या स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी सुवर्णपदक जिंकलं आहे. भारताला मिळालेलं हे तिसरं वैयक्तिक सुवर्णपदक आहे. रश्मिकाने 241 पूर्णांक 9 गुणांसह कनिष्ठ महिला एअर पिस्तूल मुकुट जिंकला. दुहेरी ऑलिंपिक कांस्यपदक विजेती मनु भाकरनं महिलांच्या 10 मीटर एअर पिस्तूल अंतिम फेरीत तिसरे स्थान पटकावलं असून रश्मिकानं वंशिका चौधरी आणि मोहिनी सिंग यांच्यासोबत या स्पर्धेत सांघिक सुवर्णपदक जिंकलं आहे. आतापर्यंत झालेल्या सर्व स्पर्धांमध्ये भारताने पाच सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्यपदके जिंकली आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.